भा. कोर्ट प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस ठाणे, पिशोर जि. औरंगाबाद

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** पिशोर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0165 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/05/2024 20:25

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 15/05/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 15/05/2024
**Time From (वेळेपासून):** 12:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 20:14 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/05/2024 **Time (वेळ):** 20:14 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 027

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/05/2024 20:14 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 20 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** चिंचोली ली ,कन्नड

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दिनेश रामदास गोरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1997

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रेऊळगाव,कन्नड,पिशोर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रेऊळगाव,कन्नड,पिशोर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल पांडुरंग सुरवसे | | | 1. रा 1-3-4-49 भिमननगर , भावसिंग पुरा,छत्रपती संभाजीनगर,पिशोर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 10 भारतीय चलनी नोटा ज्यांना अँथ्रोसीन | 5,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | पावडर लागलेली | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिनांक:-15/05/2024

मी दिनेश रामदास गोरे, वय 27 वर्ष, शेती रा.रेऊळगांव, ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर, मो.नं. 7038657027

मी वरील प्रमाणे असुन, मी दिनांक 15/05/2024 रोजी पो.नि.धस, दिंडे साहेब यांचेकडे दोन पंचासमक्ष माझ्या पैशाची मागणी होत असल्यामुळे तक्रार दिली होती की,माझी करंजखेडा शिवारात शेतगट नं.994 मध्ये शेतजमीन आहे. सदर शेत जमीनीमध्ये मी आमचे शेतापासुन जवळ असलेल्या नेवपुर मध्यम प्रकल्पातुन मातीचा गाळ मागील चार दिवसापुर्वी काढुन आमचे शेतात टाकत असताना पाटबंधारे विभागाचे श्री. राहुल सुरवसे साहेब हे आमचे जेसीबी जवळ आले व मला म्हणाले की, शासनाच्या बिना परमीशन शिवाय व आम्हाला न विचारता जेसीबीने तुम्ही कसं काय मातीचा गाळ काढु लागले असे बोलुन माझ्याकडे मातीचा गाळ काढण्याची परवानगी काढा नाही तर तुम्हाला नेवपुर प्रकल्पातील गाळ काढु देणार नाही असे म्हणुन माझी जेसीबी व ट्रॅक्टर नेवपूर प्रकल्पाच्या बाहेर काढले. त्यावेळी मी त्यांना गाळ काढु देण्याची विनंती केली असता त्यांनी मला चार हजार रुपये दयावे लागतील असे सांगुन माझ्याकडुन त्यावेळी नगदी चार हजार रुपये घेऊन निघुन गेले.त्यानंतर माझे दोन तीन दिवस गाळ काढण्याचे काम बंद होते.

त्यानंतर काल दिनांक 14/05/2024 रोजी पासुन परत त्याच नेवपुर धरणातुन माझे जेसीबी व ट्रॅक्टरने मातीचा गाळ काढुन माझे शेतात टाकण्यास सुरुवात केली असतानाच दिनांक 14/05/2024 रोजी सकाळी अंदाजे 11.00 वाजेच्या सुमारास पाटबंधारे विभागाचे श्री. राहुल सुरवसे साहेब हे आमचे जेसीबी जवळ आलेमला बोलले की, जेसीबी मशिन व ट्रॅक्टरने नेवपुर प्रकल्पाच्या बाहेर काढा नाहीतर आता इथुन पुढे जेसीबीने मातीचा गाळ काढुन ट्रॅक्टरने तुझ्या शेतात टाकु दयायचा असेल तर परत आता 5,000/- रुपये दयावे लागतील नाहीतर मशिन बाहेर काढ असे बोलले, त्यावेळी मी त्यांना ठिक हाय करतो कांही तरी असे बोललो त्यावेळी त्यांनी बोलले की उदया दिनांक 15/05/2024 रोजी पर्यंत पैसे जर आले नाही तर मी तुझा जेसीबी व ट्रॅक्टर घेऊन जाईन असे बोलले व माझ्या पासुन निघुन गेले.

त्यानंतर मी माझ्या मोबाईलवर ऑनलाईन सर्च करुन ॲन्टीकरप्शन औरंगाबादचा नंबर मिळविला. त्यावर मी फोन केला व तेथील एस.पी. साहेबांना माझ्याकडे वरील प्रमाणे पाटबंधारे विभागाचे श्री. राहुल सुरवसे साहेब यांचेकडुन पैशाची मागणी होत असल्याचे कळविले. त्यावेळी एस.पी.साहेब बोलले की, तुला एका साहेबांचा फोन येईल त्यांना तुझी तक्रार सविस्तर सांग ते कारवाई करतील. त्यानंतर मला पोलीस निरीक्षक धस साहेबांचा फोन आला व त्यांनी माझ्या तक्रारी बाबत विचारपुस केली. त्यावेळी मी धस साहेबांना लगेच कारवाईसाठी येण्याचे सांगितले. परंतू कांही वेळाने मी धस साहेबांना सांगितले की, राहुल सुरवसे साहेब हे आज रोजी निघुन गेलेले आहेत. उदया दिनांक 15/05/2024 रोजी करंजखेडा शिवारात या मी तेथे येतो असे सांगितले.

त्याप्रमाणे आज दिनांक 15/05/2024 रोजी पो.नि.धस साहेब, पो.नि.केशव दिंडे साहेब त्यांची टिम व दोन शासकीय पंचासह त्यांचेकडील जीपसह करंजखेडा शिवारात हजर आले. त्यावेळी मी माझ्याकडील मोटारसायकलने करंजखेडा शिवारात जाऊन पो.नि.धस,दिंडे साहेब व त्यांचे सोबतच्या सर्व टिमची भेट घेतली. त्यावेळी आमचा एकमेकांचा सर्वांचा परिचय झाला त्यावेळी मी पो.नि.धस,दिंडे साहेब व दोन्ही पंचांना माझी वरील प्रमाणेची सर्व हकीकत सांगितली.

पाटबंधारे विभागाचे श्री. राहुल सुरवसे साहेब हे मला नेवपुर धरणातील गाळ मी जेसीबीने काढुन ट्रॅक्टरने माझ्या

शेतात टाकत आहे.त्यासाठी 5,000/- रुपयांची मागणी करत आहेत त्यांनी मला आज पैसे घेऊन बोलविले आहे. मला पाटबंधारे विभागाचे श्री. राहुल सुरवसे साहेब यांना 5,000/- रुपये देण्याची इच्छा नाही. राहुल सुरवसे साहेब यांचेत व माझ्यात पैशाच्या देण्या घेण्याचा व्यवहार नाही, वैर दुश्मनी नाही.पाटबंधारे विभागाचे श्री. राहुल सुरवसे साहेब यांनी किंवा त्यांचे मार्फतीने इतर कोणी मला वरील कामासाठी पैशाची मागणी करुन ते पैसे स्विकारल्यास त्यांना पकडुन त्यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे.आज रोजी पाटबंधारे विभागाचे श्री. राहुल सुरवसे साहेब यांनी मला पैसे घेऊन बोलविले आहे. त्याकरीता आजच कारवाई करणेस विनंती आहे. अशी लेखी तक्रार ही मी माझ्या हस्ताक्षरात मराठीत लिहुन दिली. त्यावर मी व दोन्ही पंचांनी व पो.नि.दिंडे साहेबांनी सहया केल्या.
त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीवरुन पुढील कारावयाच्या कारवाईच्या अनुषंगाने लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाई बाबत प्रक्रियापो.नि.दिंडे साहेबांनी समजावुन सांगितली. व लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने मला दोन्ही पंच व सापळा टिमला मार्गदर्शन करुन, सुचना दिल्या. त्यानंतर थोडयाच वेळात मला पाटबंधारे विभागाचे श्री. राहुल सुरवसे साहेब यांचा मला फोन आला व त्यांनी मला चिंचोली लिंबाजी, ता.कन्नड येथे बोलविले.
त्यानंतर दिलेल्या सुचने प्रमाणे पंच क्र.1 सय्यद अलीमोददीन यांना माझ्या सोबत देऊन व्हाईस मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या अंगावर लपवुन दिला. त्यानंतर मी पंच क्र.1 सय्यद अलीमोददीन असे चिचोली लिंबाजी येथे गेलो तेथे पाटबंधारे विभागाचे राहुल सुरवसे साहेब यांना फोन केला. त्यावेळी त्यांनी मला विजय कापड दुकानाच्या समोर काचोळ्याच्या चहाचे टपरीत या असे सांगितले. त्यामुळे मी व पंच क्र.1 सय्यद अलीमोददीन विजय कापड दुकानाच्या समोरील रोडच्या पलीकडील बाजुच्या काचोळे पाटील भोजनालय व नाष्टासेंटर दुकानावर गेलो तेथे पाटबंधारे विभागाचे राहुल सुरवसे साहेब हे हजर होते त्यांची भेट झाली त्यावेळी ते मला बोलले की, अर तुमच्या मुळ मी गावातील शेतकऱ्याचे बोलणे खाल्लेकी, साहेब परवानगी नसतांना तुम्ही त्याला कस चालु दिले. कायकरायच म्हणजे आता जे चालु आहेतुमचकाल जे शंभर दिडशे ट्रिप होयेल होत आता किती झाल्या रात्र भरात? रात्री चालवल का दिवसा चालवल किती झाले ट्रिप आता पर्यत त्यावेळी मी बोललो दोनशे ट्रिपा झाल्याचे बोललो. त्यानंतर ते बोलले की, म्हणजे मला कोणी विचारल तरी म्हणता येतकी याच आले आहे, मी पाच हजार पाचशे सांगेल आहे. त्याला साडे तिन हजार रुपये याचे जे आता तुम्ही शंभर ट्रिपा टाकेल आहे त्याचे त्यावेळी मी पाच हजार रुपये असे विचारले तर त्यांनी हा म्हणले. त्यावेळी मी काही कमी जास्त करा साहेब त्याच्यात असे बोललो व ते जाऊ द्या ईठंल आपल मिटवुन घ्या ईथल्या ईथ असे बोललो त्यावेळी जा मग ते काय करतो सांग पटकण त्यावेळी मी बोललो किती थोड फार काही अँडजस्ट करा ना त्यावेळी त्यांनीपाच हजार दे भो अन याच्या खाली होणार नाही,अन याच्या पुढ तु विथआउट परमिशन जर दिसला तर मी दोनदा सोडेल आहे तिसऱ्यां वेळेस मी जमा करुन देईल असे बोलले त्यावेळी मी किती देण पडन मग बोललो त्यांनी पाच दे विषय मिटुन टाक अन आवर लवकर चल असे बोलले त्यावेळी मी पाच हजार असे बोललो तर त्यांनी हा.. आवर लवकर चल असे म्हणुन दहा पंधरा मिनटात घेऊन येण्याचे सांगितले.
त्यानंतर मी व पंच क्र.1 सय्यद अलीमोददीन माझ्या मोटारसायकलने पो.नि.दिंडे,धस साहेब यांचेकडे परत आलो. त्याठिकाणी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन घेऊन त्यातील माझे व पाटबंधारे विभागाचे राहुल सुरवसे साहेब यांचेतील संभाषण पो.नि.दिंडे,धस व पंचांनी ऐकले. त्यावेळी पाटबंधारे विभागाचे राहुल सुरवसे यांनी माझ्याकडे माझ्या तक्रारी प्रमाणे 5,000/- रुपये पैशाची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.
त्यानंतर मला, दोन्ही पंचांना, व सापळा टिमला लाचेच्या सापळा कारवाईच्या अनुषंगाने माहीती देऊन, सुचना दिंडे साहेब यांनी दिल्या. त्यावेळी दिंडे साहेब यांनी माझ्याकडे पाटबंधारे विभागाचे राहुल सुरवसे साहेब यांना देण्यासाठीच्या 5,000/- रुपयाची विचारणा केली तेंव्हा मी माझ्याकडील 5,000/- रुपये ज्यात 500/- रु.दराच्या 10 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. त्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन त्या नोटांना अँन्थ्रॉसीन पावडर लावुन माझ्या अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवुन दिल्या व पंच क्र.1 सय्यद अलीमोददीन यांना माझ्या सोबत देऊन माझ्या अंगावर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन लपवुन दिला. व लाचेची रक्कम पाटबंधारे विभागाचे राहुल सुरवसे साहेब यांना देण्यासाठी चिचोली लिंबाजी येथे काचोळे यांचे चहाचे हॉटेलमध्ये पंच क्र.1 सय्यद अलीमोददीन यांचेसह गेलो तेथे पाटबंधारे विभागाचे राहुल सुरवसे साहेब हे बसलेले होते. त्यांची भेट घेतली त्यावेळी गाळकाढण्याचे विषय चर्चा झाली. त्यावेळी त्यांना बोललो की तुम्ही जेवढे सांगितले तेवढेच आहे पाच हजार असे बोलले व मी माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजचे समोरील खिशातील अँन्थ्रॉसीन पावडर लावलेल्या नोटा 5,000/- रुपये माझ्या उजव्या हाताने काढुन पाटबंधारे विभागाचे राहुल सुरवसे साहेब यांच्या समोर धरल्या असता त्यांनी त्यांच्या डाव्या हाताने स्वत: स्विकारुन त्यांनी त्यांचे अंगातील परिधान केलेल्या शर्टाच्या समोरील डावे बाजुचे खिशात ठेवले व हाव हाव, ओके जा तु आता असे बोललो त्यावेळी त्यांचेशी चर्चा करत मी पुर्वनियोजीत ठरलेला इशारा म्हणुन मी माझ्या अंगातील पॅन्टच्या डावे बाजुचे पाठीमागील खिशातुन पांढऱ्या रंगाचाहात रुमाल काढुन

कपाळ पुसणे हा केला ती वेळ 12.50 वाजेची होती. त्याच वेळी पो.नि.दिंडे,धस साहेब व त्यांची टिम तात्काळ हजर येऊन पाटबंधारे विभागाचे राहुल सुरवसे साहेब यांना मी दिलेल्या लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले.त्यावेळी पाटबंधारे विभागाचे राहुल सुरवसे साहेब यांना पो.नि.दिंडे साहेबांनी त्यांचे नाव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव राहुल पांडुरंग सुरवसे, दप्तर कारकुन, पाटबंधारे विभाग असे सांगितले.
पाटबंधारे विभागाचे राहुल पांडुरंग सुरवसे, दप्तर कारकुन यांनी मला आज दिनांक 15/05/2024 रोजी नेवपुर प्रकल्पामधुन मी मातीचा गाळ जेसीबीने काढुन ट्रॅक्टरने माझ्या शेतात घेऊ जाऊ देण्यासाठी पंच क्र.1 सय्यद अलीमोददीन यांचे समक्ष चिचोली लिंबाजी येथील काचोळे यांचे चहाचे हॉटेलमध्ये 5,000/- रूपयांची मागणी करून, मागणी केलेले 5,000/- रुपये पंच क्र.1 सय्यद अलीमोददीन यांचे समक्ष चिचोली लिंबाजी येथील काचोळे यांचे चहाचे हॉटेलमध्येच12.50 वाजता स्वत: स्विकारले म्हणुन माझी राहुल पांडुरंग सुरवसे, दप्तर कारकुन, पाटबंधारे विभाग यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टाईप केली असुनती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

समक्ष हि फिर्याद दिली सही.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
dattu ramdas lokhande
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.) [signature]
15-5-2024

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पालीस ठाणे अंमलदार
पो. स्टे. पिशोर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SHIVAJI JANRAO NAG
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** API